सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२६ / प्र.क्र.९१/ पोल-३, दि.०७/०७/२०२६

**विषय:-** पोलीस अधीक्षक,जळगांव यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील माळी हे मृत संवर्गातील पद पुनरुज्जिवीत करण्यास मान्यता देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-३६२६/प्र.क्र.९१/पोल-३, दि.७/७/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०७०७१२४१२४३७२९ आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Chandrashekhar Govindrao Shinde
Date: 08-07-2026 17:17:56

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस अधीक्षक जळगांव.
कार्यासन अधिकारी, का.क्र.८अ,

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील माळी हे मृत संवर्गातील पद पुनरुज्जिवीत करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-३६२६/प्र.क्र.९१/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : ०७ जुलै, २०२६.

**संदर्भ** :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.DGP-D८A०५७/६/२०२५-DESK ८A, दि. २१.०४.२०२६.

२) वित्त विभाग अनौ. सं. क्र. १०६/२०२६/आपुक, दि. ३०.०४.२०२६.

**प्रस्तावना** :-

पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवर श्री. हरिश्चंद्र दिलीप पाटील हे दि.१५.०८.२००९ पासून मानधन तत्वावर माळी म्हणून कार्यरत आहेत. शासन निर्णय, गृह विभाग दि.१५.०६.२०११ अन्वये संबंधित कार्यालयासाठी १ माळी पद निर्माण करण्यात आले होते. तथापि, सदर पद आजपर्यंत नियमित पद्धतीने भरले गेलेले नाही. उक्त माळी पदावर मानधन तत्वावर कार्यरत असल्याने व सदर पद रिक्त असल्याने श्री. पाटील यांनी त्या पदावर शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याकरिता पोलीस अधीक्षक, जळगांव यांच्याकडे केलेली मागणी पोलीस अधीक्षक, जळगाव कार्यालयाच्या दि.०८.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अमान्य करण्यात आली होती. सदर पदावर नियमित सेवेत सामावून घेण्याची मागणी नाकारण्यात आल्याने श्री. पाटील यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर येथे मूळ अर्ज क्र.६३८/२०१५ दाखल केला होता. मा. न्यायाधिकरणाने दि.१९.०९.२०२४ रोजीच्या आदेशान्वये श्री.पाटील यांना शासन सेवेत दि.१५.०६.२०११ पासून सामावून घेणेबाबतचे आदेश दिले होते.

सदर आदेशाविरुद्ध शासनामार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र.८३०/२०२६ दाखल करण्यात आली होती. तथापि, मा. उच्च न्यायालयाने दि.२४.०२.२०२६ रोजी न्यायाधिकरणाचा आदेश कायम ठेवून त्याची अंमलबजावणी आठ आठवड्यांत (दि. २४.०४.२०२६ पर्यंत) करण्याचे निर्देश दिले आहेत. मा.उच्चा न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशास अनुसरुन सं.क्र.०१ येथील पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या दि.२१.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील माळी हे पद पुनरुज्जिवित करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>:-**

पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्या आस्थापनेवरील गट-ड संवर्गातील माळी हे मृत संवर्गातील पद दि.१५.०६.२०११ पासून पुनरुज्जिवीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. पोलीस अधीक्षक, जळगाव यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, छत्रपती संभाजीनगर व मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश विचारात घेऊन श्री. हरिश्चंद्र दिलीप पाटील, यांना उक्त पुनरुज्जिवीत करण्यात आलेल्या गट-ड संवर्गातील माळी या पदावर नियुक्तीबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णय हा संदर्भीय क्र. २ येथील वित्त विभागाच्या अनौ. सं. क्र. १०६/ २०२६/ आपुक, दि.३०.०४.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या <u>www.maharashtra.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०७१२४१२४३७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAGNATH RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.07.07 12:42:15 +05'30'

**(नागनाथ रा. जाधव)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. पोलीस अधीक्षक, जळगाव.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी,जळगाव.
९. उप सचिव (पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
११.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१२.निवड नस्ती, पोल-३.